# कृषि उत्पन्न बाजार समिति

## कळमेश्वर जि. नागपूर


दूरध्वनी क्र. ०७११८-२९९४३४ Email: am_kalmeshwar@msamb.com

# वार्षिक अहवाल


## २०२३-२४



संपूर्ण देशामध्ये कोरोना काळातील प्रथम लॉकडाऊन वेळी तालुक्यातील कापुस उत्पादक शेतकऱ्यांचा कापूस विक्री अभावी घरी असताना शेतकरी आर्थिक अडचणीत होता त्यावेळेस राज्याचे माजी कॅबीनेट मंत्री मा. श्री. सुनिलजी केदार यांनी पुढाकार घेऊन सि.सी.आय. मार्फतीने शासकीय खरेदी केन्द्र कोहळी येथील जिनिंग मध्ये सुरु केले त्यावेळेस उपस्थित माजी कॅबीनेट मंत्री मा. श्री. सुनिलजी केदार व इतर उपस्थित मान्यवर










**बाबाराव कवडुजी पाटील**
सभापती
मो. 09960958860

**सौ. प्रतिभाताई न. पालटकर**
उपसभापती
मो. 09766307367

**अभय भु. राऊत**
सचिव
मो. 09850311340

# सर्व शेतकरी, शेतमजुर अडते, व्यापारी व नागरिकांना

## हार्दिक शुभेच्छा



श्री. बाबाराव क. पाटील
(सभापती)
9960958860





सौ. प्रतिभाताई न. पालटकर
(उपसभापती)
9766307367

## कार्यकारी संचालक मंडळ



श्री. शंकरराव देशमुख
9423604498



श्री. संजयराव ठाकरे
9921171997



श्री. वासुदेवराव निंबाळकर
9850698790



श्री. प्रशांतराव निंबाळकर
9822227700



श्री. विजयराव ठाकरे
9823910524



श्री. प्रभाकरराव रानडे
9049837326



श्री. काशीरावजी भकने
9923129102



श्री. नरेशजी गोतमारे
9890202086



श्रीमती जीजाबाई निंबाळकर
9764314663



श्रीमती माधुरीताई श्रीखंडे
9823984355



श्री प्रदिपजी चनकापूरे
9371249257



श्री. राजेशजी माडेकर
9518305767



श्री. सुधीरजी पोहनकर
9284990605



श्री ज्ञानेश्वरजी काळे
9637297261



श्री. विनोदजी पवार
9198791818

+ सर्व सोयीयुक्त भाजीबाजार व धान्यबजार + इलेक्ट्रॉनिक्स वेट मशीनने योग्य मोजमाप
+ व्हॉट्स्पद्वारे शेतमालाचे भाव शेतकऱ्यापर्यंत + किड नियंत्रण व व्यवस्थापणाबाबत दरवर्षी शेतकऱ्यांना प्रशिक्षण व चर्चासत्राचे आयोजन

# कृषि उत्पन्न बाजार समिती,

कळमेश्वर जि. नागपूर.

## निमंत्रण

संस्थेच्या वार्षिक साधारण सभेच्या निमीत्ताने
बुधवार दि. २८/०८/२०२४ रोजी दुपारी १२.०० वाजता
आयोजित केलेल्या

## सहभोजनास

सहभागी व्हावे हि विनंती.

• स्थळ •

**संत्रा बाजार सभागृह, कळमेश्वर**

• स्नेहांकीत •

**बाबाराव क. पाटील**
सभापती
कृषि उत्पन्न बाजार समिती, कळमेश्वर

**कृषि उत्पन्न बाजार समिती, कळमेश्वर, जि. नागपूर.**

# कार्यालय कृषि उत्पन्न बाजार समिती,

## कळमेश्वर जि. नागपूर.

जावक क्र. ७३/२०२४ वार्षिक सर्वसाधारण सभा

# वार्षिक सर्वसाधारण सभेची सुचना

प्रति,

श्री/श्रीमती ______________________

______________________

महोदय,

आपणास कळविण्यात येते की, कळमेश्वर कृषि उत्पन्न बाजार समितीची वार्षिक सर्वसाधारण सभा दि. २८/०८/२०२४ बुधवार रोजी आयोजित केली आहे. वार्षिक सर्वसाधारण सभा दुपारी १२.०० वाजता खालील विषय सुची प्रमाणे संत्रा बाजार समितीचे सभागृह, कळमेश्वर येथे घेण्यात येणार आहे.

तरी आपण सभेला उपस्थित राहावे, हि विनंती.

## सभेची विषय सुची

१) संचालक मंडळाचे वतीने सादर केलेला सन २०२३-२०२४ च्या वार्षिक अहवालाची माहीती देणे.

२) सन २०२३-२०२४ चे ताळेबंद पत्रकाची माहीती देणे.

३) सन २०२४-२०२५ आर्थिक अंदाज पत्रक, माहितीस्तव सादर करणे.

४) मा. सभापती हयांचे परवानगीने वेळेवर येणारे विषय.

कळमेश्वर.

दिनांक :०६/०८/२०२४

**अभय भु. राऊत**
सचिव
कृषि उत्पन्न बाजार समिती, कळमेश्वर.

टिप : आमसभेत येतांना अहवाल पत्राची प्रत सोबत आणावी.

# आमचे श्रध्दास्थान



## सहकार महर्षी बाबासाहेब केदार

# आमचे मार्गदर्शक



## मा. श्री. सुनीलबाबु केदार

माजी कॅबीनेट मंत्री

पशुसंवर्धन, दुग्धविकास, क्रिडा व युवक कल्याण महाराष्ट्र राज्य

# सर्वसाधारण सभेचा अहवाल

सन्माननिय बंधु भगिनीनो,

कळमेश्वर कृषि उत्पन्न बाजार समितीच्या वार्षिक सर्वसाधारण सभेच्या निमीत्याने आपणा सर्वांचे मी मनःपुर्वक हार्दिक स्वागत करतो.

कळमेश्वर कृषि उत्पन्न बाजार समितीची दिनांक ०२/११/१९६२ ला स्थापना झाली आहे. महाराष्ट्र राज्य कृषि उत्पन्न खरेदी विक्री (विकास व विनियमन) १९६३ नुसार दि. २६/०९/१९६९ ला प्रत्यक्ष कामकाजास सुरूवात झालेली असुन बाजार समिती ५६ व्या वर्षात पदार्पन करणार आहे.

समितीने नियमनाखाली तांदुळ, गहू, ज्वारी, मुंग, चना, उडीद, बाजरा, सोयाबीन, जवस, तीळ, भुईमुंग शेंगा, एरंडी, अंबाडी, धान, कापूस, मिरची, चिंच, सरकी, संत्रा, आंबा, मोसंबी, केळी, सेफ, द्राक्षे व इतर फळे, बटाटे, कांदा, लसून, अद्रक, सुरन टोमॅटो, कोकम, पालेभाज्या, या सर्व प्रकारच्या भाजीचा प्रकार व फुले तसेच जनावरे, बकरी, मेंढ्या, अधिसुचित केली असून सर्व मुख्य व उपबाजारांत नियमीत सर्व शेती माल खरेदी - विक्रीचे व्यवहार होतात.

शेतकऱ्यांच्या मालाचे पावसापासून संरक्षण करून शेत मालाला चांगला बाजार भाव मिळवून देण्याचे दृष्टीने एक कार्यक्षम बाजार समिती म्हणून आपली प्रतिष्ठा निर्माण करण्यात समितीला यश मिळालेले आहे. या पार्श्वभुमीवर समितीचा सन २०२३ - २०२४ या वर्षाचा वार्षिक अहवाल सादर करतांना आनंद वाटतो.

समितीचे कार्यक्षेत्र कळमेश्वर तालुक्यापुरते मर्यादीत असून एकूण १०७ गावाचा त्यात समावेश आहे. मुख्य बाजार आवार कळमेश्वर येथे संत्रा, भाजीपाला व गुरांचा बाजार भरविण्यात येतो. तसेच उपबाजार ब्राम्हणी येथे असून त्या ठिकाणी धान्य व कापूस ह्या शेतीमालाचे नियमन करण्यात येते.

## १) बाजार आवारांतील सोयी. सुविधा व सेवा :-

बाजार आवाराकरीता नगर परिषद कळमेश्वर कडून व खाजगी शेतकऱ्यांकडून ८.३३ एकर जमीन भुसंपादीत करून त्या ठिकाणी शेतीमाल, भाजीपाला, जनावरे यांचे नियमन केल्या जाते. या ठिकाणी शेतकरी प्रशिक्षण केन्द्र तसेच एकूण ४५ गाळयाचे बांधकाम केलेले आहे. भाजीपाला बाजार येथे जाण्या येण्याकरीता डांबरी रोडचे बांधकाम केलेले आहे. तसेच भाजीबाजाराचा विस्तार केलेला असून त्याठिकाणी नविन सिमेंट रोड तयार करण्यात आलेला आहे शेतीमाल मोजमाप करण्याकरीता ५० मे.टन. क्षमतेचा संगणीकृत काटा बसविण्यात आलेला आहे. त्या ठिकाणी पाणी व्यवस्था, विजेची व्यवस्था इत्यादी आवश्यक सुविधा उपलब्ध केलेल्या आहे. तसेच स्वागत व्दार व ५०० मे. टन गोडावूनचे बांधकाम पुर्ण झालेले आहे.

# कृषि उत्पन्न बाजार समिती, कळमेश्वर, जि. नागपूर.

उपबाजार आवार ब्राम्हणी करिता समितीचे मालकीचे ५.०५ एकर जागा भुसंपादीत केलेली असून त्याठिकाणी धान्य व कापूस बाजार ह्या शेतीमालाचे नियमन करण्यात येते. या ठिकाणी शेतकऱ्यांचा धान्य माल ठेवण्याकरिता स्वनिधीतून टिन शेड, लिलाव ओटा व दोन गोडावूनचे बांधकाम करण्यात आलेले आहे. तसेच यार्डचे बाजूला सिमेंन्टीकरण रोड, मुख्य रस्ता सिमेंट रोड, बाजारास संरक्षण भिंत, स्वागत व्दार व १००० मे. टन गोदाम इत्यादी बांधकाम केलेले आहे.

## २) प्रस्तावित लोकहीतोपयोगी कामे :-

१) मुख्य बाजार आवार कळमेश्वर येथे शेतकऱ्यांच्या सोयीच्या दृष्टीने पुढील पाच वर्षाचा व्यवसाय विकास आराखड्यात खालील बांधकामाचा समावेश केला आहे.
सिमेंट रोड, उपहार गृह, शेतकरी निवास, विद्युतीकरण व कमर्शियल कॉम्प्लेक्स व गोडाऊन ७५० मे टन इत्यादीचा समावेश आहे.

२) उपबाजार आवार ब्राम्हणी येथे समितीचे कार्यालय, १००० मे. टन. गोडावून, व धान्य चाळणी यंत्र, इत्यादीचा समावेश करण्यात आलेला आहे.

## ३) विद्युत व्यवस्था :-

समितीने मुख्य बाजार कळमेश्वर व उपबाजार आवार ब्राम्हणी येथे महावितरणकडून विद्युत पुरवठा घेतला आहे. विज बिल कमी करणे करीता सोलर सिस्टम विद्युत यंत्रणा स्वयंपुर्णकरणेचे प्रस्तावीत आहे.

## ४) संगणीकरण :-

समितीने संगणक घेतलेले असून कार्यालयीन सर्व कामकाज संगणकाव्दारे सुरू झालेले आहे. तसेच बाजार भाव दिसण्यासाठी डिस्प्ले बोर्ड व दोन ५४ इंची एल.ई.डी.टि.व्ही. लावले असून इंटरनेट व्दारे शेतमालाचे बाजार भाव समिती बाजार भाव पहावयास मिळतात. तसेच शेतकऱ्यांना दररोजच्या बाजार भावाची माहिती देणेकरीता मोबाईलवर व्हॉट्ॲस्प पाठविण्याची सुविधा देण्यात येत आहे.

## ५) बाजार समितीचे उत्पन्न :-

समितीचे प्रमुख उत्पन्न बाजार फीचे असून कृषि उत्पादीत सर्व शेतमालाचे खरेदीदाराकडून बाजार फी कायदेशीर तरतुदीनुसार वसुल करण्यात येते तसेच अनुज्ञप्ती व इतर फी ची आकारणी केली जाते.

**मागील वर्षात प्राप्त झालेल्या फी ची माहीती खालील प्रमाणे.**

| अ.क्र. | विवरण | २०१९-२०२० | २०२०-२०२१ | २०२१-२०२२ | २०२२-२०२३ | २०२३-२०२४ |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | बाजार फी | १,८४,०९,५१७/- | १,२९,७९,९८६/- | १,१८,७२,५०६/- | १,४१,५९,६६६/- | १,४९,४३,८८६/- |
| २. | अनुज्ञप्ती फी | १६,७६०/- | १६,४८०/- | १७,३८०/- | १५,६४०/- | ४३,५००/- |
| ३. | मापाई फी | ४,५०,०६०/- | ५,२९,८५०/- | ४,४७,६३०/- | ५,४२,६३०/- | ५,९०,६४०/- |
| ४. | इतर फी | ५९,८८,८५७/- | ५४,७७,७८१/- | ७२,७६,५४५/- | ७३,६१,५४०/- | ८३,२०,८०९/- |
| ५. | एकुण | २,१२,६५,११४/- | १,९०,०४,०९७/- | १,९६,१४,०६१/- | २,२०,७६,४७६/- | २,३८,९८,८३५/- |

## ६) अनुज्ञप्तीबाबत माहीती :-

समितीला घोषित शेतमालाच्या नियमनाकरिता खालील अनुज्ञप्ती प्रदान करण्याचे अधिकार प्राप्त असल्याने गेल्या ५ वर्षातील अनुज्ञप्ती धारकाची / व्यवसायीकांची संख्या खालील प्रमाणे -

| अ.क्र. | अनुज्ञप्ती प्रकार | २०१९-२०२० | २०२०-२०२१ | २०२१-२०२२ | २०२२-२०२३ | २०२३-२०२४ |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | संत्रा विभाग अडते | --- | --- | --- | --- | --- |
| २. | संत्रा विभाग व्यापारी | ०४ | ०१ | ०१ | ०२ | ०२ |
| ३. | धान्य विभाग अडते | १८ | १६ | १९ | १५ | १५ |
| ४. | धान्य विभाग व्यापारी | ३१ | २४ | २६ | २४ | २४ |
| ५. | भाजी बाजार अडते | ३३ | ३० | ४४ | ३८ | ३८ |
| ६. | कापुस विभाग अडते | ०१ | ०१ | ०१ | ०१ | ०१ |
| ७. | कापुस विभाग व्यापारी | ०५ | ०४ | ०४ | ०५ | ०५ |
| ८. | प्रकीया | ०१ | ०१ | ०१ | ०१ | ०१ |
| | एकुण | ९३ | ७७ | ९६ | ८६ | ८६ |

## ७) बाजार समिती समोरील समस्या व अडचणी :-

बाजार समितीचे कार्यकारी मंडळ कार्यकुशलतेने कार्य करीत असल्यामुळे लहान रोपट्यांचे रूपांतर वटवृक्षात झालेले आहे. परंतु बाजाराचा संपुर्ण विकास होऊ शकला नाही. तरी समितीचे मार्केट यार्डातील अत्यावश्यक सुविधा करण्यासाठी संचालक मंडळ व कर्मचारी प्रयत्नशिल आहे.

बाजार समित्यांना त्यांची विकास कामे पुर्ण करण्याकरीता आजही बरेच प्रश्न भेडसावत असून ते पुर्ण करण्याचे दृष्टीकोणातून शासनाच्या सहकार्याची गरज आहे.

कृषि उत्पादक शेतमालाची आवक ही शेतमालाच्या उत्पादनावर अवलंबून असते. परंतू नैसर्गिक आपत्तीमुळे दरवर्षी येणारे उत्पन्न हे सारखेच राहील याची शाश्वती देता येत नाही. तसेच बाजार समितीला दरवर्षी मिळणारे उत्पन्न देखील सारखेच राहील याची बाजार समितीला खात्री नसते. परंतू नियमानुसार ठरवुन दिलेला खर्च दरवर्षी करावाच लागतो. त्यांत कर्मचाऱ्यांचा पगार व भत्ते, स्थानिक कर, विद्युत देयके, कृषि पणन मंडळाची वर्गणी, गैर कृषि कर, विपणनाची व्यवस्था करून देणे, शासनाने वेळोवेळी बाजार समितीचे नियमन कमी केले आहे. त्यामुळे समितीचे उत्पन्न कमी होऊन विकास कार्य प्रभावित होईल.

अत्याधुनिक सोयी उपलब्ध करून देणे व तांत्रिक दृष्ट्या शेतकऱ्यांचे मार्गदर्शन करणे इत्यादी महत्वाची कामे करण्याकरीता बाजार समितीचा खर्च कमी केल्याशिवाय ह्या बाबी शक्य होणार नाही.

## ८) भेटी :-

बाजार समितीप्रती महाराष्ट्र शासनाची भुमिका अहवाल वर्षात सहकार्याची व सहानुभुतीची राहलेली आहे. अहवाल वर्षात समितीने केलेल्या कामाचा व्याप निश्चितच भुषनावह असून भविष्य काळही उज्वल राहील असे अपेक्षित आहे तसेच आपणाकडून मार्गदर्शन व सहकार्याची अपेक्षा आहे. अहवाल वर्षात माजी मंत्री श्री सुनिलबाबू केदार, पशु संवर्धन दुग्ध व्यवसाय विकास, क्रिडा व युवक कल्याण मंत्री महाराष्ट्र राज्य, मा. श्री श्यामकुमारजी बर्वे खासदार, रामटेक लोकसभा तसेच कृषि उत्पन्न बाजार समिती, कळमेश्वरचे माजी सभापती श्री अरविंदजी रामावंत व कृषि उत्पन्न बाजार समिती कळमेश्वरचे माजी सर्व सन्माननिय संचालक, तसेच बाजार समितीचे माजी प्रशासक डॉ. श्री हेलोंडे, मुख्य प्रशासक श्री विरेंद्रसिंहजी बैस (पाटील) आणि माजी प्रशासकिय मंडळ सर्व सदस्य, माजी जिल्हा परिषद अध्यक्ष सौ. रश्मीताई बर्वे, जि.प. अध्यक्षा सौ. मुक्ताताई कोकड्डे, जि.प. उपाध्यक्षा कु. कुंदाताई राऊत, जि. प. महिला व बालकल्याण सभापती प्रा. सौ. अवंतिकाताई लेकुरवाळे, जि.प. कृषि सभापती श्री बाळुभाऊ जोध, जि.प. समाज कल्याण सभापती श्री मिलींदजी सुटे, जि.प. अर्थ व शिक्षण सभापती श्री राजकुमारजी कुसुंबे, कळमेश्वर पं.स. सभापती श्री प्रभाकरजी भोसले, पं.स. उपसभापती श्री श्रावणजी भिंगारे, माजी पं.स. सभापती श्री वैभवजी घोंगे, माजी सभापती सौ. विभाताई निंबाळकर, माजी पं.स. उपसभापती नरेन्द्रजी पालटकर, कळमेश्वर तालुका खरेदी विक्री संस्थेचे अध्यक्ष मा. श्री बाबाराव कोढे, उपाध्यक्ष, श्री आशिष देशमुख तसेच खरेदी विक्री सहकारी संस्था कळमेश्वरचे सर्व सन्माननिय संचालक मंडळ मा. श्री अशोकजी भागवत, मा.कॉं. कमेटी, कळमेश्वर, मा. श्री श्रीरामजी काळे, माजी अध्यक्ष तालुका समन्वय समिती कळमेश्वर, ह्यांनी समितीला भेटी देऊन शेतकऱ्यांशी चर्चा करून शेतकऱ्यांच्या अडचणी जाणुन घेवून समितीला मार्गदर्शन केले. त्याबद्दल मी स्वतः व संचालक मंडळ यांच्या वतीने आभारी आहे. तसेच श्रीमान एस. एस. आतराम लेखापरिक्षक सहकारी संस्था नागपूर यांनी सुध्दा समितीला मार्गदर्शन केले आहे. मी त्यांचा सुध्दा आभारी आहे तसेच मा.श्री महेन्द्रजी डोंगरे जि.प. सदस्य धापेवाडा सर्कल, मा.श्री देवानंदजी कोहळे, जि.प. सदस्य गोंडखैरी सर्कल, मा.सौ. पिंकीताई कौरती जि.प. सदस्य तेलकामठी सर्कल, मा.सौ. जयश्रीताई वाळके पं.स.सदस्या धापेवाडा, विजयराव भांगे पं.स. सदस्य सेलु, मा.सौ. मालतीताई वसु पं.स. सदस्या तेलकामठी, मा.सौ. वंदनाताई मोरे (बोधाने) पं.स. सदस्या उबाळी

या ठिकाणी आवर्जून उल्लेख करावा वाटतो की, सहकार महर्षी मा. श्री बाबासाहेब केदार ह्यांचे प्रेरणेतून ह्या बाजार समितीला नेहमीच मिळालेल्या मार्गदर्शनाबद्दल मी त्यांचा अत्यंत ऋणी आहे. या बाजार समितीच्या निर्मीती करिता व बाजार भरविण्याकरिता कळमेश्वर तालुक्यातील शेतकरी बांधवांनी व सर्व प्रकारच्या व्यवसायीकांनी जी भरीव मदत केली व त्यांचे मदतीशिवाय बाजार भरविणे शक्य नव्हते अशा सर्वांचे त्यांनी केलेल्या सहकार्याबद्दल मी त्यांचे आभार मानतो.

समितीमध्ये येणाऱ्या शेतीमालापैकी कापूस व धान्य ह्या शेतीमालाचा प्रामुख्याने उल्लेख करता येईल. तसेच शेतमालाचे विक्रीनंतर येथून परराज्यात व देशाबाहेर माल पाठविला जातो. त्यामुळे बाजार समिती क्षेत्रातील भरत असलेले बाजारास महत्व प्राप्त झालेले आहे. याकरीता आपण सर्वांनी केलेल्या मोलाच्या सहकार्यामुळेच समितीला प्रगती करणे शक्य झाले आहे.

कळमेश्वर तालुक्यांतील सेवा सहकारी संस्था अध्यक्ष, उपाध्यक्ष व त्यांचे सहकारी ग्रामपंचायतचे सरपंच, उपसरपंच व त्यांचे सहकारी सदस्य, व्यापारी, अडते, हमाल, तसेच अनावधानाने ज्यांचे नांव सुटल्या गेलेले प्रतिष्ठीत मान्यवर तसेच कृषि उत्पन्न बाजार समिती अधिकारी व कर्मचारी यांच्या सहकार्यामुळे हे घडू शकले.

आपण करीत असलेल्या सहकार्याबद्दल मी आपणा सर्वांचे पुनःच आभार मानुन हा अहवाल संपवितो.

**व सर्व संचालक मंडळ** | **बाबाराव क. पाटील**
सभापती

# विनम्र

# श्रध्दांजली

अहवाल वर्षात जे देशभक्त, स्वातंत्र्य सेनानी, थोर नेते, लेखक, संशोधक, कवी, साहीत्यीक, कलावंत, शास्त्रज्ञ, तंत्रज्ञ, खेळाडू, सामाजिक व सहकारी कार्यकर्ते, बाजार समिती कळमेश्वर, या सर्वांच्या कुटूंबीयांचे दुःखात सहभागी असून दिवंगतांना भावपुर्ण विनम्र श्रध्दांजली अर्पण करित आहोत. त्यांच्या आत्म्यास शांती लाभो अशी ईश्वर चरणी प्रार्थना.

# लेखा परिक्षकाचा अहवाल

(महाराष्ट्र सहकारी संस्थांचा कायदा कलम ८१ (५ब आणि)
महाराष्ट्र सहकारी संस्थाचा नियम ६९ अन्वये द्यावयाचा)

मी कृषि उत्पन्न बाजार समिती कळमेश्वर या समितीच्या सोबत जोडलेल्या दि. १/४/२०२२ ते दि. ३१/०३/२०२३ या दिनांकाच्या ताळेबंदाचे व या दिनांकास संपणाऱ्या वर्षाच्या उत्पन्न व खर्च पत्रकाचे लेखापरिक्षण केले असून अहवाल सादर करतो की,

१) माझ्या मते लेखापरिक्षणाचे उद्देशासाठी माझे संपुर्ण ज्ञानाप्रमाणे व विश्वासाप्रमाणे जरूर ती सर्व माहिती व खुलासे मला उपलब्ध झाले आहे.

२) माझे मते मला मिळालेल्या माहिती/खुलाशांचे आधारे.
अ) ताळेबंद व नफातोटा पत्रक संस्थेने ठेवलेल्या हिशोबी पुस्कांशी जुळत असून सदर ३१ मार्च २०२३ या दिनांकाचा ताळेबंद संस्थेच्या व्यवहाराची/कामकाजांची सत्य व वास्तव स्थिती दर्शवितो आणि नफा तोटा पत्रकाचे बाबतीत त्या दिनांकास संपणाऱ्या वर्षातील नफ्याची/तोटयाची सत्य व वास्तव स्थिती दर्शवितो.
ब) समितीचे/संस्थेचे हिशोब हे त्यावरील टिप्पनसपात्र राहुन महाराष्ट्र सहकारी संस्थाच्या कायद्यानुसाार आवश्यक ती माहीती देणारे आहेत व संस्थेच्या आर्थिक व्यवहाराची सत्य व वास्तव स्थिती दर्शवितात.

३) माझ्या मते संस्थेने महाराष्ट्र सहकारी संस्थाचा कायदा, नियम व संस्थेचे पोटनियम यानुसार आवश्यक असणारी हिशोबी पुस्तके योग्य रितीने ठेवलेली आहेत.

एस. एस. आतराम
विशेष लेखापरीक्षक वर्ग–2
सहकारी संस्था (पणन)
नागपूर विभाग, नागपूर

स्थळ : कळमेश्वर

दिनांक : ३०/०४/२०२४

# कर्मचाऱ्यांची यादी

| कर्मचाऱ्यांचे नांव | पद |
|---|---|
| १) श्री अभय भुजंगराव राऊत | सचिव |
| २) श्री सुरेश दौलतराव जोगी | लेखापाल |
| ३) श्रीमती कल्पना से. टेकाडे | लिपीक |
| ४) श्री शरद सु. ठाकरे | लिपीक |
| ५) श्रीमती जयश्री ब. काळे | शिपाई |

# उत्पन्न व खर्च पत्रक

| उत्पन्न बाजु | ३१/०३/२०२४ |
|---|---|
| बाजार फी | १,४९,४३,८८६.०० |
| अनुज्ञप्ती फी | ४३,५००.०० |
| अन्य आय | ६,०८,४६५.०० |
| गुन्तवणूक आय | ७६,८३,०९२.०० |
| मालमत्ता आय | ६,१९,८९२.०० |
| एकुण | २,३८,९८,८३५.०० |

सुरेश दौ. जोगी
लेखापाल

अभय भु. राऊत
सचिव

# कृषि उत्पन्न बाजार समिती, कळमेश्वर, जि. नागपूर.

## दि. ०१/०४/२०२३ ते ३१/०३/२०२४

| खर्च बाजु | ३१/०३/२०२४ |
| --- | --- |
| आस्थापना खर्च | ५१,९०,७९५.०० |
| प्रबंधन खर्च | ६७,८९,४४७.०० |
| समिती सदस्य खर्च | ५,९१,९७०.०० |
| अन्य खर्च | २२,१६,५१५.०० |
| वाढवा | ९१,१०,१०८.०० |
| एकुण | २,३८,९८,८३५.०० |

सौ. प्रतिभाताई न. पालटकर
उपसभापती

बाबाराव क. पाटील
सभापती

## कृषि उत्पन्न बाजार समिती, कळमेश्वर, जि. नागपूर.

# ताळेबंद पत्रक

| देयता बाजु | | ३१/०३/२०२४ |
|---|---|---|
| **एकुण निधी** | | १८,७६,४६,०८३.९४ |
| निधी | ३,४६,४३,६९३.३० | |
| बाजार विकास निधी | ४५,४६,०८७.०० | |
| संचित वाढवा | १४,८४,५६,३०३.६४ | |
| **एकुण देय** | | ५,०८,३७,६५८.५८ |
| तरतुद | २६,२८,२३२.०० | |
| अनामत देयता | ४,५४,७४,५७१.०० | |
| अन्य देयता | २७,३४,८५५.५८ | |
| | एकुण | २३,८४,८३,७४२.५२ |

सुरेश दौ. जोगी
लेखापाल

अभय भु. राऊत
सचिव

# कृषि उत्पन्न बाजार समिती, कळमेश्वर, जि. नागपूर.

## दि. ३१/०३/२०२४ अखेर

| संपत्ती बाजु | | ३१/०३/२०२४ |
|---|---|---|
| **चल व अचल संपत्ती** | | ६,५४,४६,७३९.६१ |
| अविक्रेय माल | २८,७४,९७०.३२ | |
| इमारत | ६,२५,७१,७६९.२९ | |
| **गुंतवणुक** | | १५,६२,१९,५८५.६९ |
| कर्मचारी भविष निर्वाह निधी | ५७,५६,९३०.३२ | |
| उपदान निधी मुदत ठेव | ८१,९०,६२४.०० | |
| ना.डी.से.को.बँक शेअर्स | ५,०००.०० | |
| म.रा.बा.सह. संघ | ९००.०० | |
| मुदत ठेव पत्रक | १२,०७,२१,८२५.४२ | |
| मुदत ठेव पत्रक (झिज फंड) | ३४,२२,३३१.०० | |
| मुदत ठेव पत्रक (दुकान अग्रिम) | १०,२६,६९५.०० | |
| मुदत ठेव पत्रक कर्म. अर्जित रजा | ३३,५९,७६३.०० | |
| मुदत ठेव पत्रक बाजार फी देणे निधी | ५,९३,५७०.०० | |
| मुदत ठेव पत्रक सेवा निवृत्ती निधी | ९,२९,८६६.०० | |
| मुदत ठेव पत्रक बांधकाम निधी | १,१६,६२,२२५.०० | |
| मुदत ठेव पत्रक निवडणुक निधी | ५,२७,०३१.०० | |
| NIPHT शेअर्स | १०,१००.०० | |
| मुदत ठेव पत्रक दुष्काळ निधी | १२,७२४.९५ | |
| **इतर आय** | | १,६८,१७,४१७.२२ |
| डिपॉझीट (अनामत) | ४७,५२,५४५.०० | |
| अखेर शिल्लक | २१,२३५.०० | |
| बँकेत जमा रक्कम | १,१४,९८,५०३.०७ | |
| इतर जमा | ५,४५,१३४.१५ | |
| | एकुण | २३,८४,८३,७४२.५२ |

सौ. प्रतिभाताई न. पालटकर
उपसभापती

बाबाराव क. पाटील
सभापती

# कृषि उत्पन्न बाजार समिती, कळमेश्वर, जि. नागपूर.

कार्यालयीन पत्र क्रमांक : १८१/२०२४ — दिनांक : २५/०१/२०२४

अन्वये मा. सरव्यवस्थापक महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळ पुणे ह्यांचेकडून मंजुरी प्राप्त

जा. क्र. कृपम/बास/अस/२०२४-२०२५ मंजुरी/दि. २९/३/२०२४

## सन २०२४-२०२५ चा मुळ अर्थ संकल्प

| क्र. | मुख्य शिर्षक | जमा बाजू एकुण उत्पन्न | क्र. | मुख्य शिर्षक | खर्च बाजू एकुण उत्पन्न |
|---|---|---|---|---|---|
| अ | फी (शुल्क) | १,४०,५१,१००/- | ख | सभा खर्च | ६,९५,०००/- |
| ब | इतर | ५,६७,५००/- | ग | आस्थापना खर्च | ७६,८०,०००/- |
| क | गुंतवणुकीतील उत्पन्न | ८८,७१,०००/- | घ | प्रशासकिय खर्च | ७८,८१,४८०/- |
| ड | अनुदान | ------- | च | मुख्य व दुय्यम बाजार | ३,४०,०००/- |
| इ | ठेवी | १३,२१,३७,९३०/- | छ | व्याज | ५,००,०००/- |
| | | | ज | कर्ज परतफेड (व्याज सोडून) | ५,००,०००/- |
| | | | त | भांडवली खर्च | ७,२२,०३,०००/- |
| | एकुण रूपये | १५,५६,२७,५३०/- | | एकुण रूपये | ८,९७,९९,४८०/- |
| | सुरूवातीची शिल्लक | ९,४२,५४,४७९/- | | अखेर शिल्लक | १६,००,८२,५२९/- |
| | एकुण | २४,९८,८२,००९/- | | एकुण | २४,९८,८२,००९/- |

**सुरेश दी. जोगी** — लेखापाल

**अभय मु. राऊत** — सचिव

**सौ. प्रतिभाताई न. पालटकर** — उपसभापती

**बाबाराव क. पाटील** — सभापती



कृषि उत्पन्न बाजार समिती, कार्यकारी संचालक मंडळ, कळमेश्वर



कृषि उत्पन्न बाजार समिती कळमेश्वर यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित आमसभा व भव्य मेळावा (शेतकरी महिला) मध्ये हजारोच्या संख्येने उपस्थित महिला वर्ग




समितीची वार्षिक सर्वसाधारण सभा व भव्य मेळावा (शेतकरी महिला) या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे मा. श्री सुनीलजी केदार साहेब, माजी कॅबीनेट मंत्री महाराष्ट्र राज्य यांचे पुष्पहाराने स्वागत करतांना समितीचे सभापती व संचालक मंडळ



समितीच्या संयुक्त विद्यमाने आयोजित पिक चर्चा सत्रामध्ये उपस्थित प्रमुख पाहुणे
मा. श्री. सुनीलजी केदार, माजी कॅबीनेट मंत्री महाराष्ट्र राज्य
यांचे स्वागत करतांना समितीचे सभापती श्री. बाबाराव पाटील, व
या कार्यक्रमास उपस्थित मान्यवर मा.सौ.मुक्ताताई कोकड्डे, अध्यक्षा जिल्हा परिषद नागपूर,
मा. कु. कुंदाताई राऊत उपाध्यक्षा जिल्हा परिषद नागपूर व इतर मान्यवर.

# कृषि उत्पन्न बाजार समिती, कळमेश्वर जि. नागपूर

## कार्यकारी संचालक मंडळ

दिनांक १८/१०/२१ पासून

| नं. | संचालकाचे नाव | पद | गांव | मतदार संघ | दुरध्वनी क. |
|---|---|---|---|---|---|
| १. | श्री. बाबाराव कवडूजी पाटील | सभापती | मु. तिष्टी बु. | सेवा सह. सर्व साधारण | 9960958860 |
| २. | सौ. प्रतिभाताई नरेंद्रजी पालटकर | उपसभापती | मु. ऊबाळी | ग्राम पं. सर्व साधारण | 9766307367 |
| ३. | श्री. शंकरराव लक्ष्मणराव देशमुख | संचालक | मु. गोंडखैरी | सेवा सह. सर्व साधारण | 9423604498 |
| ४. | श्री. संजयराव कृष्णराव ठाकरे | संचालक | मु. बोरगांव धु. | सेवा सह. सर्व साधारण | 9921171997 |
| ५. | श्री. वासुदेवराव शंकरराव निंबाळकर | संचालक | मु. तिष्टी खु. | सेवा सह. सर्व साधारण | 9850698790 |
| ६. | श्री. प्रशांत बाबासाहेब निंबाळकर | संचालक | मु. दहेगांव | से.स. ईतर मागासवर्ग | 9822227700 |
| ७. | श्री. विजयराव बापूरावजी ठाकरे | संचालक | मु. मोहगांव | सेवा सह. सर्व साधारण | 9823910524 |
| ८. | श्री. प्रभाकरराव रघुनाथरावजी रानडे | संचालक | मु. धा[illegible]वाडा | सेवा सह. सर्व साधारण | 9049837326 |
| ९. | श्री. काशीराव शंकरराव भक्ते | संचालक | मु. कळमेश्वर | सेवा स.वि.भ.ज./जा. | 9923129102 |
| १०. | श्री नरेशजी शांताराम गोतमारे | संचालक | मु. घोराड | सेवा सह. सर्व साधारण | 9890202086 |
| ११. | श्रीमती जिजाबाई माधवराव निंबाळकर | संचालिका | मु. ब्राम्हणी | सेवा सह.महिला राखीव | 9764314663 |
| १२. | श्रीमती माधुरीताई देविदास श्रीखंडे | संचालिका | मु. म्हसेपठार | सेवा सह.महिला राखीव | 9823984355 |
| १३. | श्री. प्रदिपजी महादेवरावजी चनकापुरे | संचालक | मु. सेलु | ग्राम प.अनु.जा/जमा | 9371249257 |
| १४. | श्री. सुधीरराव विठ्ठलराव पोहनकर | संचालक | मु. [illegible]डखैरी | ग्राम प.सर्व साधारण | 9284990605 |
| १५. | श्री. राजेशजी भाऊराव माडेकर | संचालक | [illegible] | ग्राम प. आ. दृष्टया दु.घ. | 9518305767 |
| १६. | श्री. ज्ञानेश्वरराव जगन्नाथजी काळे | संचालक | मु. स[illegible]डी | अडते/व्यापारी संघ | 9637297261 |
| १७. | श्री. विनोदराव उदारामजी पवार | संचालक | मु. कळमेश्वर | अडते/व्यापारी संघ | 9158791818 |

अनुक्रमांक ७३/२०२४

दिनांक : ०६/०८/२०२४

# कृषि उत्पन्न बाजार समिती, कळमेश्वर, जि. नागपूर.

## सभेला येतांना कृपया हे पुस्तक सोबत आणावे.

आमचे सर्व सन्माननीय शेतकरी, व्यापारी, अडते, हमाल व असंख्य हितचिंतक ह्यांना खरीप रब्बी हंगाम भरभराटीच जावो.अशी

हार्दिक शुभेच्छा



Book-Post
Under Certificate of Posting

प्रति,

श्री/श्रीमती ____________________

____________________

मुक्काम ____________ पोस्ट ____________

ता. कळमेश्वर जि. नागपूर-४४१५०१

*If Not Delivered & Please retrun to:-*


प्रेषक :

कृषि उत्पन्न बाजार समिती, कळमेश्वर जि. नागपूर

ता.कळमेश्वर जि. नागपूर-४४१५०१. ☎ : ०७११८-२९९४३४


जनशक्ती प्रिंटिंग प्रेस, ब्राम्हणी - ९६७३३०७७३८